RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक ३०] बुधवार, एप्रिल १२, २०१७/चैत्र २२, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३८**

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ एप्रिल २०१७.

**अधिसूचना**

**भारतीय वन अधिनियम, १९२७.**

क्रमांक बांबूसा-२०१७/प्र. क्र. ५९/फ-९.—ज्याअर्थी, शासन अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक टीआरएस-२००९/प्र. क्र. ६७/फ-९, दिनांक २४ जून २०१३ अन्वये, महाराष्ट्र शासनाने राज्यातील वनेतर जमीनीवरील डॅन्ड्रोकॅलमस स्ट्रिक्टस व बाम्बूसा बॅम्बोस (*Dendrocalamus Strictus and Bambusa Bambos*) यांच्या व्यतिरिक्त बांबूच्या सर्व प्रजातींना त्यावेळी प्रचलित असलेले मुंबई वन नियम, १९४२ चे प्रकरण VI मधील वन-उपजाची वाहतूक अंतर्गत नियमांच्या अंमलबजावणीतून सूट दिली होती ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाला बांबूच्या सर्व प्रजातींना संपूर्ण राज्यात महाराष्ट्र वन नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) च्या प्रकरण VII मधील वन उपजाची वाहतूक या संबंधातील नियमांच्या अंमलबजावणीतून सूट देणे समयोचित वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र राज्यास लागू असलेल्या, भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४१, पोट-कलम (३) तसेच उक्त नियमांतील नियम ३१ चे उप-नियम कलम (१) चे खंड (इ) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र राज्यातील वनेतर जमिनीवरील बांबूच्या सर्व प्रजातींना, उक्त नियमांच्या प्रकरण VII यामध्ये अंतर्भूत वन-उपजाची वाहतूक या संबंधातील नियमांच्या अंमलबजावणीतून सूट देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रकाश महाजन,**
शासनाचे सहसचिव.